# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०६/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक १४/०६/२०२४ रोजी चे ०२.३० वा. ते ०३.०० वा. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक विभाग येथील स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना शिरपुर फाटा ता. रामटेक येथे अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने रामटेक येथील शिरपुर फाटा येथे नाकाबंदी करून, वाहने तपासत असताना एक आयसर क्र. MH-40-CT-0571 हे वाहन येतांना दिसले. त्यास थांबवुन सदर वाहनाची पाहणी केली असता आयसर क्र. MH-40-CT-0571 मध्ये एकुण १६ नग बैल व गोरे अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने आरोपींच्या ताब्यातून एकुण १६ नग बैल व गोरे किंमती १,६०,०००/—रू. व आयसर क्र. एम एच ४०/सिटी ०५७१ किंमती १०,०००००/— व असा एकुण ११,६०,०००/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी चालक १) तुलसीदास तुलाराम भलावी वय ३५ वर्ष, रा. बिसारपुर ता कुरई जि. शिवनी म. प्र, कंडक्टर २) बशीर वल्द अब्दुल अजीज कुरेशी रा. शिवाजी चौक पिवळी नदी नागपुर ३) मोहम्मद शफीक कुरेशी रा. नागपुर फरार यांचेविरुद्ध कलम ११(११) (d) (e) (f) प्रा. छळ. प्रति. का. सहकलम ५A(१) म. प. स. अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोशि सचिन गेडाम, नापोशि अनिल सपाटे, चालक नितेश उपरे यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर